# रायगड जिल्हा परिषद, अर्थ विभाग निविदा सूचना सन २००११ - २०१२

रायगड जिल्हा परिषदेच्या सर्व विभागाना व पंचायत समिती, बाल विकास प्रकल्प,प्राथमिक आरोग्य केंद्र यांना सन २०११ - २०१२ या वर्षाकरिता लागणा-या लेखन साहित्याचे पुरवठयाचे वार्षिक दरकरार निश्चित करण्यासाठी पुरवठादारांकडून मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग याचे नांवे दिनांक ३० / ११ /२०११ रोजी दूपारी ठिक २.०० वाजे पर्यत अर्थ विभाग रायगड जिल्हा परिषद, अलिबाग येथे पोहचतिल अशारितीने खाली नमुद केल्याप्रमाणे निविदा मागविणेंत येत आहे

लखोटा क्र १

तांत्रिक निविदेचा लिफाफा असे त्यावर नमुद करुन खालील प्रमाणे त्यांत कागदपत्र भरुन लखोटा मोहोरबंद करावा. १) इसारा रक्कम भरलेले धनाकर्ष , २) शॉप ॲक्टप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र , ३.) राज्य व केंद्रीय विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र व निविदेच्या तारखेपर्यत विक्रिकर भरल्याचे प्रमाणपत्र, ४). निविदेच्या तारखेपर्यत आयकर भरल्याचे प्रमाणपत्र , ५). भागीदार संस्था,फर्म,लघुउदयोग संस्था असल्यास त्याबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र , ६.) रु १० लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक साहित्य, पुरवठा केल्या बाबतचा पुर्वानुभव, असल्यास कोणत्या सस्थेला किंवा कार्यालयास माल पुरवठा केला त्याचे नांव व पुरवठा केलेल्या साहित्याचा प्रकार.

लखोटा क्रमांक २

मुख्य निविदा असे त्यावर नमुद करुन त्यामध्ये निविदा सादर करुन लखोटा मोहोरबंद करावा व वरील दोन्ही लखोटे क्र १ व २ हे एका तीस-या लखोटयात मोहरबंद करुन पाठवावेत.

तपशिल

| क्र | कामाचे नांव | साहित्य पुरवठयाची अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | निविदा फार्मची किम्मत | निविदा नमुना वाटपाचा दिनांक | निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत | साहित्य पुरवठयाची मुदत | करारनामा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रायगड जिल्हा परिषदेच्या सर्व विभागाना व तालुकास्तरा वरील सर्व कार्यालये पंचायत समिती, बाल विकास प्रकल्प,प्राथमिक आरोग्य केंद्र यांना साहित्य पुरवठा करणे. | ३०,००,००० | ३०,००० | १००० | १६.११.११ ते ३०.११.११ दुपारी २.०० वाजे पर्यत (सुट्टीचे दिवस वगळून) | १.१२.११ दुपारी २.०० वाजे पर्यत | ठेका निश्चित झाले पासून एक वर्षा पर्यत | |

मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा दिनांक . १.१२.२०११ रोजी सायंकाळी ठिक ४.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचे कक्षात उपस्थित पुरवठादारांच्या समक्ष उघडण्यांत येतील. तसेच निविदा उघडण्याच्या दिवशी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासकिय कारणास्तव निविदा उघडता आल्या नाहित. तर त्या नंतरच्या तारखेस निविदा उघडण्यांत येतील.

प्राप्त झालेल्या प्रत्येक निविदेतील लखोटा क्र १ प्रथम उघडला जाईल व त्यामध्ये समाविष्ट करावयास सुचित केलेले कागदपत्र असतील तरच लखोटा क्र २ उघडला जाईल व त्यात नमुद केलेले साहित्य पुरवठयाचे दर विचारात घेतले जातील. जर लखोटा क्र १ मध्ये आवश्यक ते कागदपत्र नसतील तर निविदाकराची निविदा रदद समजली जाईल प्राप्त झालेली कोणतीही एक किंवा सर्वच्या सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. निविदेच्या शर्ती व अटी निविदे सोबत दिल्या जातील.

लक्ष्मण पाटील
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग

मनोहरशेठ भोईर
सभापती,
अर्थ व बांधकाम समिती
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग

अभिजित बांगर
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग.

सुभाष ( पंडित शेठ) प्र पाटील
अध्यक्ष,
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग